**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
**शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३.**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ ऑगस्ट, २०११.

पहा :- शासन परिपत्रक समक्रमांक दि. ६.५.२०११.

## परिपत्रक

सर्व मंत्रालयीन विभागांना महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०११ च्या संबंधाने वरील संदर्भित शासन परिपत्रकान्वये वित्तीय वर्ष सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पिय तरतूदीच्या विनियोगाबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदरच्या संदर्भीय परिपत्रकातील परिच्छेद ५.८ नुसार नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाज २०११-१२ च्या खंड-१ मधील स्थानिक आमदार विकास निधी च्या तरतूदी, तसेच खंड-२ ते खंड-३६ मधील जिल्हा वार्षिक योजनांच्या तरतूदी यांच्या खर्चासाठी निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी वित्त विभागाच्या व्यय शाखा व अर्थसंकल्प शाखा यांच्या मान्यतेची आवश्यकता नाही. त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( सु. प्र. कानडे )**
सह सचिव, वित्त विभाग.

प्रति,

सर्व सह / उप सचिव, अर्थसंकल्प शाखा, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -एक, महाराष्ट्र (VLC Section), मुंबई (२५ प्रती).
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -दोन, महाराष्ट्र (VLC Section), नागपूर (५ प्रती).
महालेखापाल (लेखापरीक्षा) -एक, महाराष्ट्र, मुंबई (१५ प्रती).
महालेखापाल (लेखापरीक्षा) -दोन, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती).
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती).
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती).
निवासी लेखा अधिकारी, मुंबई (५ प्रती).
कार्यासन प्रशासन-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभागातील सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव.
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती, अर्थसंकल्प-३